मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अखेर 'तो' रॅम्प दहा वर्षांनी वाहतुकीस खुला

## महापालिकेने नागरिकांकडून मागविल्या आहेत सूचना

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
कासारवाडी येथील नाशिक फाटा चौकातील लूप (रॅम्प) तब्बल दहा वर्षांनंतर वाहतुकीसाठी खुला करण्यात येत आहे. त्यासाठी महापालिकेने नागरिकांकडून सूचना मागविल्या आहेत; मात्र तेथील दुभाजक बंद केला जाणार नसल्याने हा चौक सिग्नल फ्री होणार नसल्याने वाहनचालकांतून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. जागतिक बँकेचे कर्ज घेऊन महापालिकेने चौकात उद्योजक जेआरडी टाटा दुमजली उड्डाणपूल बांधला आहे. कासारवाडीहून पिंपरीच्या दिशेने उतरण्यासाठी रॅम्प आणि पिंपळे गुरव-भोसरी पुलावरून चौकात उतरण्यासाठी लूप बांधला आहे. लुपसाठी सुमारे १० कोटींचा खर्च झाला




आहे. वाहने थेट चौकात उतरणार असल्याने अपघात होण्याचा धोका असल्याने वाहतूक पोलिसांनी हा लूप वाहतुकीस खुला करण्यास परवानगी दिली नाही. गेली १० वर्षे हा लूप बंद स्थितीत आहे. तर, लूप चुकीचा पद्धतीने बांधल्याने तो खुला केला जात नसल्याचा विरोधकांनी आरोप केला आहे. तर, महामेट्रोचे काम पूर्ण झाल्यानंतर लूप सुरू करण्याची ग्वाही महापालिका आयुक्तांनी दिली होती. मेट्रोचे काम पूर्ण झाल्याने लूप वाहतुकीस खुला केला जाणार आहे. त्यामुळे पुलावरून खाली चौकात येऊन पुण्याच्या दिशेने जाणार्या वाहन चालकांची सोय होणार आहे. मात्र, चौकात येथे दुभाजक लावून चौक सिग्नल फ्री करण्यात येणार नाही. त्यामुळे सर्व बाजूच्या वाहन चालकांना येथे सिग्नलला थांबावे लागणार आहे. त्यामुळे नाराजी व्यक्त केली जात आहे.

# यंदाचा पठ्ठे बापूराव पुरस्कार मालती इनामदार यांना जाहीर

## शरद पवारांच्या हस्ते होणार सन्मान

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
यावर्षीचा 'पठ्ठे बापूराव पुरस्कार' ज्येष्ठ लोकनाट्य कलावंत मालती इनामदार यांना जाहीर करण्यात आलाय. येत्या ३० नोव्हेंबरला शरद पवारांच्या (हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आलाय. मालती इनामदार यांच्याबरोबर शोभा इस्लामपूरकर, कृष्णा मुसळे आणि वैशाली वाफळेकर या लोककलावंतांचाही सन्मान करण्यात येणार आहे. लोककलांसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना शाहीर पठ्ठे बापूराव प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतो . यंदा या पुरस्काराचे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. शाहीर पठ्ठे बापूराव पुरस्कार जेष्ठ लोकनाट्य कलावंत मालती इनामदार यांना जाहीर करण्यात आला आहे. लोकसाहित्यिक 'डॉ. भास्करराव खांडगे' पुरस्कार लावणी गायिका आणि




नृत्यांगणा शोभा इस्लामपुरकर यांना जाहीर झालाय. पवळा पुरस्कार लावणी नृत्यांगणा आणि गायिका वैशाली वाफळेकर यांना जाहीर करण्यात आलाय. शाहीर 'बापुसाहेब जिंतीकर पुरस्कार' प्रसिद्ध ढोलकी वादक कृष्ण मुसळे यांना जाहीर झालाय. पठ्ठे बापूराव प्रतिष्ठान हे सन १९९८ पासून दरवर्षी 'शाहीर पठ्ठे बापूराव पुरस्कार' देते. आतापर्यंत अनेक दिग्गज नृत्यांगणा या पुरस्काराच्या मानकरी ठरल्या आहेत. यामध्ये दिदराबाई गुळखंडकर, आशा काळे, शकुंतला नगरकर आणि छाया खुटेगाबकर यांचा समावेश आहे. दरम्यान पुणे महानगरपालिकाही १९९५ पासून दरवर्षी 'लोकशाहीर पठ्ठे बापूराव पुरस्कार' देते.यावर्षीचा 'पठ्ठे बापूराव पुरस्कार' ज्येष्ठ लोकनाट्य कलावंत मालती इनामदार यांना जाहीर करण्यात आलाय. येत्या ३० नोव्हेंबरला शरद पवारांच्या (हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. बालगंधर्व रंगमंदिरात पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आलाय. मालती इनामदार यांच्याबरोबर शोभा इस्लामपूरकर, कृष्णा मुसळे आणि वैशाली वाफळेकर या लोककलावंतांचाही सन्मान करण्यात येणार आहे. लोककलांसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना शाहीर पठ्ठे बापूराव प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतो.

# संविधानिक अधिकारांसोबत कर्तव्यांचेही पालन करा

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांचे आवाहन

**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** सामाजिक आणि आर्थिक न्याय, आचार, विचार, धर्म, श्रद्धा यांचे स्वातंत्र्य आणि राजकीय समानता व समान संधी देण्याचे अभिवचन देणारे भारतीय संविधान दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपण भारतीयांनी अंगिकृत केले. आजच्या या मंगलदिनी संविधानातील अधिकार स्वातंत्र्यासोबतच कर्तव्ये आणि जबाबदारी पालनाचाही संकल्प प्रत्येक नागरिकाने केला पाहिजे, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले. पिंपरी-चिंचवड भाजपाच्या वतीने पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे भारतीय संविधान दिनी अभिवादन करण्यात आले. यावेळी संविधानातील ''उद्देशिका'' पालन करण्याची शपथ घेण्यात आली. यावेळी मावळ



> “ जगातील सर्वश्रेष्ठ राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली देशात भारतीय संविधानामुळे सामाजिक शांतता आणि समानता प्रस्तापित झाली. ‘आम्ही भारताचे लोक’ असा विश्वास देणाऱ्या संविधान दिनाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकाने भारतीय संविधानातील अधिकारांचे स्वातंत्र्य उपभोगावे आणि कर्तव्याचे पालनही केले पाहिजे. देशाला बलशाली बनवण्यासाठी संवैधानिक मूल्यांचे जतन करण्याची आवश्यकता आहे.
> — शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

लोकसभा संयोजक सदाशिव खाडे, पिंपरी विधानसभा प्रमुख अमित गोरखे, महिला मोर्च्याच्या अध्यक्षा सुजाता पालांडे, सरचिटणीस वैशाली खाड्ये, भाजपा उपाध्यक्ष माऊली थोरात, शहर सरचिटणीस संजय मंगोडेकर, नामदेव ढाके, शहर कार्यकारिणी सदस्य निता कुशारे, माजी नगरसेवक बाबा त्रिभुवन, सागर अंगोळकर, संतोष कांबळे, माजी नगरसेविका सविता खुळे, मा. स्वीकृत सदस्य विठ्ठल भोईर, मंडल अध्यक्ष संदीप नखाते, निलेश अष्टेकर, प्रसाद कस्पटे, सोमनाथ भोंडवे, आयुष्यमान भारत संयोजक गोपाळ माळेकर, ओबीसी मोर्च्याचे अध्यक्ष राजेंद्र राजापूरे, सहकार सेलचे अध्यक्ष माधव मनोरे, उत्तर भारतीय आघाडीचे अध्यक्ष आकाश भारती, सामाजिक कार्यकर्ते नवनाथ जांभूळकर, कृष्णा भंडलकर, श्रीकांत पवार, प्रकाश जावळकर, दीपक भंडारी, हृषीकेश कांबळे, सागर बिरारी, उज्ज्वला गावडे, सोना गडदे, नीता मुंगसे आदी उपस्थित होते.

# आरोग्य कर्मचाऱ्यांचा कपडे व मिठाई देऊन सन्मान

## कार्तिकी वारीनिमित्त पंढरपूर येथे राबविला स्तुत्य उपक्रम

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपळे गुरव येथील मराठवाडा जनविकास संघाच्या वतीने कार्तिकी वारीचे औचित्य साधून पंढरपूरमधील ९५ आरोग्य कर्मचारी महिलांना साडी व पुरुषांना पोशाख, मिठाई देऊन सन्मान करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मणराव कोरके, मराठवाडा जनविकास संघाचे संस्थापक अध्यक्ष अरुण पवार, ह.भ.प. निर्मलाताई थिटे, धारूरचे लोकनियुक्त सरपंच बालाजी पवार,




आशाताई पवार, गणेश पवार, आशिष पवार, अभिषेक पवार, वैष्णवी पवार, पंढरपूर देवस्थान मंदिर समितीतील कर्मचारी दशरथ देवकुळे, सुरेखा ढेरे आदी यावेळी उपस्थित होते. वृक्षमित्र अरुण पवार यांनी सांगितले, की समाजात वावरत असताना आपल्याला समाजातील अनेक असंघटित व दुर्लक्षित घटक दिसून येतात. कार्तिकी यात्रेसाठी राज्यभरातून भाविक पंढरपूरमध्ये येतात. यामध्ये संपूर्ण शहराच्या स्वच्छतेची जबाबदारी आरोग्य कर्मचाऱ्यांवर असते. कचरावेचक, साफसफाई कर्मचारी, सुरक्षारक्षक हे घटक समाजासाठी खूप काम करत असतात. सकाळी लवकर उठून पहाटेपासूनच मंदिरातील स्वच्छता, छोटे गल्ली रस्ते, मंदिर परिसर स्वच्छ करतात. त्यामुळे त्यांचा सन्मान झाला पाहिजे, या दृष्टीने त्यांचा पोशाख, साडी व मिठाई देऊन सन्मान करण्यात आला.

# कचरा जाळणाऱ्यांकडे पालिकेचे दुर्लक्ष!

## प्रदूषणाची पातळी वाढल्याने हवेची गुणवत्ता ढासळली

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

शहरातील प्रदूषणाची पातळी वाढल्याने आणि हवेची गुणवत्ता ढासळली असतानाही सार्वजनिक ठिकाणी कचरा जाळणाऱ्यांकडे महापालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा जाळून प्रदूषण करणाऱ्यांविरोधात गेल्या पंचवीस दिवसांत ८० नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. कचरा जाळण्याचे प्रमाण वाढत असताना कारवाई मात्र संथ गतीने सुरू असल्याचे चित्र आहे. शहरातील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक जागेत उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर थेट कारवाई करण्याचा इशारा महापालिकेने दिला होता.




त्यासाठी विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत. महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर कारवाई केली जाते. मात्र, यापुढे नोटीस किंवा समज देण्याची कारवाई होणार नसून, थेट दंडात्मक कारवाई केली जात आहे. मात्र, त्याचा वेग संथ असल्याचे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. शहरात नदीपात्र, विविध घाट, पूल, नाले, राष्ट्रीय महामार्ग, कालव्यामध्ये कचरा टाकण्याचे आणि जाळण्याचे प्रमाण मोठे आहे. मध्यवर्ती भागासह उपनगरांमध्ये सर्रास सुका कचरा जाळला जात आहे. मात्र, पंधरा क्षेत्रीय कार्यालयांकडून संथ गतीने कारवाई केली जात आहे. गेल्या पंचवीस दिवसांत केवळ ८० जणांवर कारवाई करून ५० हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे. दरम्यान, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या २ हजार ९७५ नागरिकांवर कारवाई करण्यात आली असून, आठ लाख ८३ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. पुणे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम म्हणाले, की सध्या कारवाई सुरू आहे. कारवाईचा वेग वाढविण्याची सूचना

### उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर कारवाई

**» शहरातील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक जागेत उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर थेट कारवाई करण्याचा इशारा महापालिकेने दिला होता. त्यासाठी विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत. मात्र, त्याचा वेग संथ असल्याचे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. शहरात नदीपात्र, विविध घाट, पूल, नाले, राष्ट्रीय महामार्ग, कालव्यामध्ये कचरा टाकण्याचे आणि जाळण्याचे प्रमाण मोठे आहे. मध्यवर्ती भागासह उपनगरांमध्ये सर्रास सुका कचरा जाळला जात आहे.**

क्षेत्रीय कार्यालय आणि विशेष पथकाला करण्यात आली आहे. शहरातील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक जागेत उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर थेट कारवाई करण्याचा इशारा महापालिकेने दिला होता. त्यासाठी विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत. महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर कचरा जाळणाऱ्यांवर कारवाई केली जाते. मात्र, यापुढे नोटीस किंवा समज देण्याची कारवाई होणार नसून, थेट दंडात्मक कारवाई केली जात आहे. मात्र, त्याचा वेग संथ असल्याचे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.

# पेंडींच्या निर्यातीत ३० टक्क्यांनी वाढ!

## सोयाबीन, मोहरीच्या खाद्याला मागणी

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

उच्चांकी तेल आयातीमुळे आर्थिक अडचणीत आलेल्या देशी खाद्यतेल उद्योगाला पेंडींच्या निर्यातीमुळे दिलासा मिळाला आहे. एप्रिल – ऑक्टोबर या काळात मागील वर्षांच्या तुलनेत पेंडींच्या निर्यातीत ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. बिगर जणुकीय सुधारित सोयाबीन आणि मोहरीच्या पेंडीला आग्नेय आशियासह अमेरिका आणि युरोपातून मागणी आहे.


द सॉल्व्हंट एक्स्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ इंडियाने दिलेल्या माहितीनुसार सोयाबीन, मोहरी, तीळ, शेंगदाणा तेल तयार करण्याच्या प्रक्रियेत तेल काढल्यानंतर शिल्लक राहणारी आणि पोल्ट्री खाद्य आणि पशूखाद्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पेंडीची एप्रिल-ऑक्टोबर या काळात देशातून २५,६६,०५१ टन निर्यात झाली आहे. मागील वर्षी याच काळात १९,७५,४९६ लाख टन पेंडींची निर्यात झाली होती. यंदा ५, ९०,५५५ लाख टन निर्यात जास्त झाली आहे. फक्त ऑक्टोबर महिन्याचा विचार करता, यंदाच्या ऑक्टोबर महिन्यात २,८९,९३१ टन निर्यात झाली होती. मागील वर्षीच्या ऑक्टोबरमध्ये



२,१३,१५३ टन निर्यात झाली होती. बिगर जणुकीय सुधारित सोयाबीन आणि मोहरीच्या पेंडीला आग्नेय आशिया, अमेरिका आणि युरोपातून मोठी मागणी आहे. या पेंडीचा वापर पशूखाद्य आणि पोल्ट्री खाद्यासाठी मोठ्या प्रमाणावर केला जातो. भारत बिगर जणुकीय सुधारित तेलबियांच्या पेंडीचा जगातील सर्वात मोठा उत्पादक आहे. सोयाबीन पेंडींची निर्यात ५७० डॉलर प्रति टन दराने होत होती. त्यात वाढ होऊन मागील महिन्यात ६०६ डॉलर प्रति टन दराने निर्यात होत आहे. मागील वर्षी मोहरीच्या पेंडीची २२, ९६, ९४३ टन इतकी आजवरची उच्चांकी निर्यात झाली होती. यंदाही मोहरीच्या पेंडीची वेगाने निर्यात सुरू आहे. एप्रिल – ऑक्टोबर महिन्यांत १५,१३,९१७ टन निर्यात झाली आहे. मोहरीच्या पेंडीची ३२५ ते ३३५ डॉलर प्रति टन दराने प्रामुख्याने दक्षिण कोरिया, व्हिएतनाम, थायलंड आदी देशात निर्यात सुरू आहे. देशातून दरवर्षी पाच-सहा लाख टन भाताच्या पेंडीची (राईस ब्रान मील) निर्यात होते. ही निर्यात प्रामुख्याने व्हिएतनाम, बांगलादेश, थायलंडला होत होती. पण देशांतर्गत पशूखाद्य आणि पोल्ट्री खाद्याच्या दरात वाढ झाल्यानंतर केंद्र सरकारने ३० नोव्हेंबरपर्यंत भाताच्या पेंडीच्या निर्यातीवर निर्बंध लागू केले आहेत.

# पुणे नगर रस्त्यावर टँकर उलटून वायुगळती ; नागरिकांमध्ये भीती

## प्रशासनाकडून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे काम सुरू



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुण्यातील वडगाव शेरी चौकामध्ये ज्वलनशील पदार्थ घेऊन जाणारा टँकर पलटी झाला. पुणे-अहमदनगर राज्य महामार्गावर ही दुर्घटना घडली. मध्यरात्री ही दुर्घटना घडल्यामुळे लोकांमध्ये भीतीचे वातावरण होते. टँकरमध्ये एथिलीन ऑक्साइड घेऊन जाण्यात येत होते. यामध्ये आग लागू शकते अथवा जोरदार धमका होण्याची भीती असते. टँकर चालक त्या दुषीत हवेमुळे आजारी पडल्याचेही समोर आलेय. पुणे प्रशासनाकडून टँकर बाजूला करण्याचे काम सुरु आहे. जवळपास ८ अग्निशामन दलाच्या गाड्या, पुणे पोलिसांसह प्रशासनाची इतर पथकेही घटनास्थळी उपस्थित आहेत. वडगाव शेरी चौकालगत टँकर पलटी होऊन वायुगळती झाल्याने खबरदारीचा उपाय म्हणून वाहतुक इतर मार्गांवर वळवण्यात आली आहे. प्रशासनाकडून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे काम सुरू असून नागरिकांना विनंती आहे की त्यांनी सतर्क रहावे व प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन पुणे महानगरपालिकेकडून करण्यात आलेय. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे अहमदनगर राज्य महामार्गावर ज्वलनशील पदार्थ घेऊन जाणारा टँकर पलटी झाला. पुण्यातील वडवाग शेरी चौकामध्ये टँकर पटली झाला. पुणे फायर ब्रिगेडच्या अधिकाऱ्याला मध्यरात्री १२.४७ मिनिटांनी याबाबतची माहिती मिळाली. एका खासगी रासायनिक कंपनीद्वारे टँकरमधून एथिलीन ऑक्साइड घेऊन जाताना ही दुर्घटना घडली. टँकरमध्ये मोठ्या प्रमाणात एथिलीन ऑक्साइड होते. हे अधिक ज्वलनशील, विषारी रसायन होय. पोलिसांनी वेळीच टँकरच्या आजूबाजूचा परिसर बंद केला. बॅरिकेडिंग करण्यात आले. पुणे फायर ब्रिगेड आणि पोलिसांच्या पथकाने या स्थितीला संभाळले. घटनास्थळावर पोलिस आणि अग्निशामन दलाच्या जवान जवान तैणात आहेत. टँकर बाजूला करण्यासाठी तज्ज्ञांची मदत घेण्यात आली. रहदारीच्या ठिकाणी टँकर पलटी झाला होता. पुणे अहमदनगर रोडवरील वडगाव शेरी चौकात दिवसरात्र रहदारी असते. येथे मोठ्या प्रमाणात लोकांचे वास्तव्य आहे. त्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले. प्रशासनाच्या विविध पथकांनी घटनास्थळी जाऊन नियंत्रण केले. या ठिकाणी अग्निशामन दलाच्या आठ तुकड्या तैणात होत्या. यावरुन घटनेचे गंभिर्य समजू शकता. अग्निशामन दलाकडून टँकरवर वारंवार पाणी टाकण्यात येतेय, जेणेकरुन विषारी वायू मुळे कोणताही दुर्घटना घडू नये.

---

# पुणे पोलिसांच्या विरोधात रविंद्र धंगेकर आक्रमक!

## बुधवारी पोलीस आयुक्त कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करणार



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** ललित पाटील प्रकरणी आमदार रविंद्र धंगेकर हे पुन्हा एकदा आक्रमक झाल्याचं पाहायला मिळत आहे. पुणे पोलीस ललित पाटील प्रकरणात कारवाई करत नसल्याने मी बुधवारपासून पोलीस आयुक्त कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे. त्यासोबतच गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे या प्रकरणाल लक्ष घालत नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. ललित पाटील प्रकरणात ससुन रुग्णालयाचे डीन डॉक्टर संजीव ठाकूर यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. डॉक्टर ठाकूर यांना पदमुक्त केल्यानंतर नवीन डीन डॉक्टर विनायक काळे यांना अजुनही पदभार दिलेला नाही. ससून हे पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठे रुग्णालय आहे. ससुन रुग्णालयातील कोणावरही पुणे पोलीस कारवाई करताना दिसत नाहीत. त्यामुळे शासनाची नाचक्की होतेय. पुणे पोलिसांकडून ससून रुग्णालयातील क्लार्क महेंद्र शेवतेला अटक होण्याची गरज आहे. त्याच्या चौकशीतून अनेक गोष्टींचा उलगडा होईल. पुणे पोलीस ललित पाटील प्रकरणात कारवाई करत नसल्याने मी बुधवारपासून पोलीस आयुक्त कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करणार, असा इशारा त्यांनी दिली आहे. यावेळी त्यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरदेखील त्यांनी निशाणा साधला आहे. ललित पाटील प्रकरणात देवेंद्र फडणवीस लक्ष घालत नाही आहे. पुणे पोलीसांना कोट्यावधी रुपयांचा हप्ता मिळतो. पुण्यात हुक्का पार्लय, पब, बार अशा अनेक ठिकाणी गैरप्रकार होतात. या गैर प्रकारावर आळा घालण्यात यावा, असंही ते म्हणाले आहेत. ललिल पाटील ड्रग्स प्रकरणाबाबत विधिमंडळात विषय मांडणार आहे. यासंदर्भात विविध मागण्यादेखील करणार आहे.